# महाविद्यालय विकास समिती सभा

दि. २४.०३.२०२१

आज बुधवार दिनांक २४ मार्च २०२१ रोजी ११:०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा एस. एस. एन. जे महाविद्यालय देवळी येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. समीर सुरेशराव देशमुख, अध्यक्ष यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा हे होते. सभेला खालील सभासद उपस्थित होते.

1) श्री. समीर सु. देशमुख - संस्थाध्यक्ष
2) श्री. सतीशराव के. राऊत - व्यवस्थापन प्रतिनिधी
3) श्री. प्रकाशराव ज. ढांगे - शिक्षणतज्ञ
4) श्री. शशांकुराव् गं. घोडमारे - उद्योग
5) श्री. मा. प्रा. सुरेशराव बा. देशमुख - संशोधन
6) श्री. प्रा. टि. एम. मॅन्युअल - IQAC समन्वयक
7) श्री. प्रा. धनराज कु. मुंगल - शिक्षक प्रतिनिधी
8) श्री. प्रा. संतोष दे. मोहदरे - विभाग प्रमुख
9) डॉ. सुषमा र. कांबळे - शिक्षक प्रतिनिधी महिला
10) श्री. डॉ. गणेश गु. मालधुरे - कार्यकारी प्राचार्य

सभेत खालील ठराव पारीत करण्यात आले.

विषय क्र. १ - मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव क्र. १ - कार्यकारी प्राचार्य डॉ. गणेश मालधुरे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले, ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

विषय क्र. २ - आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्र. २ - आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकाचे वाचन करण्यात आले. त्यातील त्रुटीवर चर्चा होऊन त्रुटी दुरुस्त करण्यात आल्या व नंतर सर्वानुमते अंदाजपत्रक मंजुर करण्यात आले.

विषय क्र. ३ - शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजांना मंजुरी देणे.

ठराव क्र. ३ - श्री. यु. व्ही. चौधरी, श्री. एम. पी. देशमुख, श्री. एस. डी. कोठे, श्रीमती के. आर. कुडू, श्री. डब्ल्यु. व्ही. मडावी, श्री. आर. के. कांबळे, श्री. ए. डी. सातपुते

या कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या अर्जित रजांना त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदीनुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र. ४ - वाणिज्य शाखेचे माहे ऑगस्ट २०२१ ला रिक्त होणारे पद भरण्याबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ४ - वाणिज्य शाखेत माहे ऑगस्ट २०२१ व तत्पूर्वी खाली झालेल्या तीन अशा एकूण चार रिक्तपदाविषयी सभेत चर्चा झाली. सहसंचालक शिक्षण विभाग नागपूर यांचा मंजुरीकरिता प्रस्ताव पाठवून पद भरतीकरिता पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले

विषय क्र. ५ - मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय

ठराव क्र. ५ - मा. अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे दोन प्रस्ताव मांडण्यात आले. त्याची कार्यवाही खालीलप्रमाणे.

प्रस्ताव क्र. १ - संस्थेचे माजी अध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. श्री. सुरेशराव देशमुख यांनी महाविद्यालयाच्या नुकत्याच झालेल्या नॅक मूल्यांकनात महाविद्यालयाला 'बी' दर्जा प्राप्त झाला त्याबाबतीत महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला तो सर्वानुमते सहर्ष मंजूर करण्यात आला.

प्रस्ताव क्र. २ - यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व सभेचे अध्यक्ष मा. श्री. समीरजी देशमुख यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा कल पारखून कला शाखेत दोन व वाणिज्य शाखेत दोन विषयात पदव्युत्तर वर्ग सुरु करावेत असा प्रस्ताव ठेवला. त्यावर साधक बाधक चर्चा होऊन प्रस्ताव (ठराव) सर्वानुमते मंजूर करण्यात आला. व तशी कार्यवाही करण्याबाबत कार्यकारी प्राचार्य डॉ. गणेश मालधुरे यांनी सभेला आश्वासित केले.

कार्यकारी प्राचार्यांचा धन्यवाद प्रस्तावानंतर
मा. अध्यक्षांच्या परवानगीने सचिवांनी सभा
समाप्तीची घोषणा केली.

Offg. Principal
S.S.N.J. Mahavidyalaya
DEOLI, Dist. Wardha